**लाडक्या बहिणींसाठी आनंदाची बातमी! फेब्रुवारी महिन्याचा हप्ता जमा होण्यास सुरुवात; अदिती तटकरेंनी पोस्ट करत दिली माहिती** >> पान 2

**आरोग्य सेविकेचा पुढाकार; एचपीव्ही लसीकरणावर वाढला विश्वास** >> पान 3

**एल.टी.टी. बल्लारशाहा रेल्वेला शेगांव येथे थांबा मंजूर** >> पान 4

### सुविचार

जर तुम्हाला खरच आनंद अनुभवायचा असेल तर आपल्या दु:खाशी खेळायला शिका.



# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 228 ■ शनिवार, दि. 28 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

भूत बंगलात अक्षय कुमारनं त्याच्यापेक्षा २६ वर्षांनी लहान असलेल्या नायिकेबरोबर केला रोमान्स आतील पान

# राज्यात पीएनजी प्रक्रियेला गती; खत उपलब्धतेसाठी सातत्याने आढावा सुरु : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर भारताने संतुलित आणि प्रभावी धोरण राबवले असून, यामध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारची महत्त्वाची भूमिका आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार या संकटकाळात महाराष्ट्रात पीएनजी (पाईप्ड पद्धतीने वितरण) वितरणाला गती देण्यात येत असून खतांच्या उपलब्धतेसाठी सातत्याने आढावा घेतला जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक दूरदृश्य प्रणालीद्वारे घेण्यात आली. या बैठकीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही सहभागी झाले होते. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या वतीने मुद्दे मांडले. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्रिमंडळ सचिव तसेच विविध राज्यांचे मुख्यमंत्री आणि केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल उपस्थित होते. मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी या बैठकीला उपस्थित होते.

### केंद्राच्या प्रभावी नेतृत्वामुळे संकटातही देश स्थिर; महाराष्ट्र शासन केंद्राच्या सूचनांचे पूर्णपणे पालन करेल

सध्याच्या कठीण काळात पश्चिम आशिया खंडातील युद्ध परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या जागतिक संकट काळात देशातील नागरिकांवर प्रतिकूल परिणाम होऊ नये, यासाठी घेतलेल्या निर्णयांबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.

सध्याच्या काळात महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या उपाययोजनांची माहिती देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात खतांची पुरेशी उपलब्धता असून त्याचा सातत्याने आढावा घेतला जात आहे. आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही, यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे. याचबरोबर काळाबाजार व साठेबाजी रोखण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येत आहे. शेतीशी संबंधित बाबी 'ॲग्रीस्टॅक' प्रणालीशी जोडण्याचे काम सुरू असून त्यामुळे गैरप्रकारांना आळा बसणार आहे. परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी सातत्याने बैठका घेतल्या जात असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.







केंद्र सरकारच्या सर्व सूचनांचे राज्य शासन पूर्णपणे पालन करेल, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पीएनजी (पाईप्ड नॅचरल गॅस) वितरणाला गती देण्यात आली असून 'ईज ऑफ डुइंग बिझनेस'च्या माध्यमातून प्रक्रिया सुलभ केली जात आहे. या संकटाकाळात केंद्र शासनाच्या नेतृत्वाखाली राज्य शासन आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडेल, असा विश्वासही यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जगभरात या संकटामुळे मोठा विस्कळीतपणा निर्माण झाला आहे. फिलिपाईन्समध्ये राष्ट्रीय आणिबाणी लागू करण्यात आली असून थायलंडमध्ये प्रवासावर मोठ्या प्रमाणात निर्बंध घालण्यात आले आहेत. श्रीलंकेत आठवड्यात दोन सार्वजनिक सुट्ट्या वाढवण्यात आल्या आहेत, तर पाकिस्तानमध्ये शाळा आणि कार्यालये बंद ठेवून 'वर्क फ्रॉम होम' सुरू करण्यात आले आहे. दक्षिण कोरिया, न्यूझीलंड, बांगलादेश आणि इजिप्त यांसारख्या देशांनीही विविध निर्बंध लागू केले आहेत. मात्र भारतात परिस्थिती तुलनेने सामान्य ठेवण्यात यश आले आहे, असे त्यांनी नमूद केले.

इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने उत्पादन शुल्कात (एक्साइज शुल्क) केलेली कपात ही सर्वसामान्यांसाठी मोठा दिलासा देणारी असल्याचे श्री. फडणवीस यांनी सांगितले.

जगातील अनेक देशांत पेट्रोल-डिझेलचे दर २० ते ३० टक्क्यांनी वाढले असताना भारतात त्याचा भार नागरिकांवर पडू दिला नाही. 'राष्ट्र प्रथम, भारतीय प्रथम' या तत्त्वानुसार केंद्र सरकारने हा आर्थिक भार स्वतः उचलला, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या अकरा वर्षांत ऊर्जा क्षेत्रात करण्यात आलेल्या बदलांचा आज मोठा फायदा होत असल्याचेही सांगून पूर्वी २७ देशांकडून इंधन आयात केले जात होती, ती आता ४१ देशांपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे पुरवठा खंडित होण्याचा धोका कमी झाला आहे. ई-बस आणि सौरऊर्जे सारख्या पर्यायी स्रोतांवर दिलेला भरही या परिस्थितीत उपयुक्त ठरत आहे. एलपीजीचा पुरवठा सुरळीत सुरू असून आत्मनिर्भर भारत अभियानाचे सकारात्मक परिणाम दिसून येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.


यावेळी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मध्यपूर्वेतील युद्धामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत केंद्र शासनाने उचलेल्या उपाययोजनाची माहिती दिली.

# भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात पीडित महिलांचे अश्लील व्हिडिओ व्हायरल; नाशिकमध्ये ६५ जणांवर गुन्हे दाखल

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी :** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाबाबतचे व्हिडिओ फॉरवर्ड करणार असाल तर शंभर वेळा विचार करा, कारण अश्लील व्हिडिओ शेयर केल्यास थेट गुन्हे दाखल होणार आहेत. पोलिसांनी कारवाईला सुरुवात केली आहे. भोंदूबाबा अशोक खरातशी संबंधित गुन्ह्यातील पीडित महिलांचे अश्लील व्हिडिओ आणि मॉर्फ केलेले व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करणाऱ्या ६५ जणांविरोधात नाशिक सायबर पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

६५ जणांवर गुन्हे दाखल – नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरातनं अनेक महिलांवर लैंगिक अत्याचार केले. याच अत्याचाराचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर सर्वत्र व्हायरल होत आहेत. अशात सायबर पेट्रोलिंग दरम्यान आढळून आले की, काही लोक एआय () तंत्रज्ञानाचा वापर करून फोटोंचे मॉर्फिंग करत आहेत. महिलांची बदनामी करत आहेत. त्यामुळं सायबर पोलिसांनी



अशा व्हिडिओचा शोध घेत फेसबुक, इंस्टाग्राम आणि या प्लॅटफॉर्मवर पीडित महिलांचे अश्लील व्हिडिओ आणि फोटो प्रसारित करणाऱ्या एकूण ६५ जणांवर गुन्हे दाखल केले असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

...तर गुन्हे दाखल करू – ''कोणत्याही पीडित महिलेची ओळख, तिचे नातेवाईक किंवा घराचा पत्ता उघड होईल असा कोणताही मजकूर किंवा व्हिडिओ प्रसारित करू नये, ज्यांच्याकडं असे अश्लील किंवा पीडितांची ओळख पटवणारे व्हिडिओ आहेत, त्यांनी ते तत्काळ डिलीट करावेत. व्हिडिओ शेअर करणे किंवा फॉरवर्ड करणे हा देखील गुन्हा मानला जाणार आहे. जर कोणीही अशा प्रकारचे आक्षेपार्ह व्हिडिओ, फोटो सोशल मीडियावर प्रसारित करताना आढळले, तर त्यांच्यावर गुन्हे दाखल करून थेट अटकेची कारवाई केली जाईल. आम्ही असे व्हिडिओ डिलीट करण्यासाठी फेसबुक आणि मेटाशी संपर्क करत आहोत,'' अशी माहिती नाशिक सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय पिसे यांनी दिली.

सातपूर पोलीस ठाण्यात सहा जणांवर गुन्हा दाखल – भोंदूबाबा अशोक खरातबरोबरचे पीडित महिलांचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. सोशल मीडिया ग्रुपवर व्हिडिओ प्रसारित झाल्याचं उघड झाल्यानंतर सातपूर पोलिसांनी ग्रुप ॲडमिनसह सहा जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.

## मुंडन समारंभावरून परतताना पिकअपला अपघात; तीन मुलांसह आठ जणांचा मृत्यू

कौशांबी : उत्तर प्रदेशातील कौशांबी जिल्ह्यात मोठा अपघात झाल्याची घटना घडली. जिल्ह्यातील डोरमा गावाजवळ राष्ट्रीय महामार्ग २ वर भरधाव वेगात असलेल्या पिकअप व्हॅन आणि ट्रेलरची धडक झाली. या भीषण अपघातात तीन मुलांसह आठ जणांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची बातमी मिळताच संपूर्ण परिसरात भीतीचं वातावरण पसरले. तसंच स्थानिक रहिवाशांनी बचावकार्य सुरू केलं.

कौशांबीचे पोलीस अधीक्षक राजेश कुमार यांनी सांगितलं की, ''पिकअपमधील सर्वजण फतेहपूर जिल्ह्यातील कुरोली गावचे रहिवासी होते. ते एका मुलाच्या मुंडन समारंभासाठी प्रयागराजला गेले होते. या समारंभानंतर ते आपल्या गावी परत येत होते. पिकअप व्हॅनमध्ये महिला आणि मुलांसह सुमारे १८ जण प्रवास करत होते. सैनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील डोरमा गावाजवळ पोहोचताच, समोरून येणाऱ्या एका ट्रेलरनं त्या व्हॅनला धडक दिली. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या भीषण अपघाताबद्दल तीव्र शोक व्यक्त केला. मृतांच्या कुटुंबीयांप्रति सांत्वन व्यक्त करत मुख्यमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. तसंच त्यांनी अधिकाऱ्यांना जखमींवर योग्य उपचार करण्याचे निर्दे श दिले आणि प्रत्येक जखमी व्यक्तीसाठी ५० हजार रुपयांची घोषणा केली.

# डिजिटल व्यसनामुळे दरवर्षी २० हजार मुलांचा बळी जातो, सरकारनं लक्ष घालावं : खासदार डेरेक ओ'ब्रायन यांची राज्यसभेत मागणी

नवी दिल्ली : तृणमूल काँग्रेसचे खासदार डेरेक ओ'ब्रायन यांनी आज शुक्रवारी (२७ मार्च) राज्यसभेत लहान मुलं आणि तरुणांमध्ये वाढत चाललेल्या 'डिजिटल व्यसन' या गंभीर समस्येकडे लक्ष वेधलं. या व्यसनामुळे दरवर्षी सुमारे २० हजार मुलं आत्महत्या करत असल्याचा दावा त्यांनी केला असून, या संकटावर तातडीनं उपाययोजना करण्याची मागणी सरकारकडे केली आहे.

राज्यसभेतील शून्य प्रहर दरम्यान हा मुद्दा म ांडताना त्यांनी सांगितलं की, विविध अभ्यासांनुसार मुलं आणि तरुण दररोज सरासरी ८ तास मोबाईल फोन आणि स्क्रीनसमोर घालवतात. हे प्रमाण वर्षाकाठी १०० दिवसांहून अधिक काळ स्क्रीनसम ोर घालवण्याइतकं आहे.

६८ देशांच्या शाळांमध्ये मोबाईल वापरावर बंदी : ओ'ब्रायन यांनी हेही नमूद केले की, जगातील ६८ देशांनी शाळांमध्ये मोबाईल फोनच्या वापरावर आधीच बंदी घातली आहे. अति स्क्रीन टाइममुळे झोपेत अडथळा, चिंता वाढणं आणि मन:स्थितीत वेगानं बदल होणं यांसारखे दुष्परिणाम होत असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. या समस्येचा जैविक पैलू उलगडताना त्यांनी सांगितलं की, स्क्रीनच्या अतिवापरामुळे मेंदूमध्ये डोपामाइनची पातळी वाढते. त्यामुळे मेंदूला त्वरित बक्षिसाचे संकेत मिळते. यामुळे ही वर्तणूक अधिकच दृढ होते आणि कालांतरानं तिचं रुपांतर 'डिजिटल व्यसना'मध्ये होतं.

'फोन हातात घेण्यापूर्वी स्वत:ला 'का?' प्रश्न विचारा' : यासोबच, ओ'ब्रायन यांनी वैयक्तिक पातळीवर काही व्यावहारिक सूचनाही मांडल्या. या सूचनांमध्ये फोन हातात घेण्यापूर्वी स्वत:ला 'का?' असा प्रश्न विचारणं, फोनला स्पर्श करण्यापूर्वी दहापर्यंत मोजणं, आपली उपकरणं एका वेगळ्या खोलीत चार्जिंगला लावणं, झोपण्यापूर्वी किमान दोन तास आधी स्क्रीनपासून दूर राहणं आणि 'साउंड ऑफ सायलेन्स'चा सराव करणं म्हणजेच, एका निश्चित कालावधीसाठी स्क्रीन किंवा फोन वापरण्यापासून स्वत:ला परावृत्त करणं यांचा सम ावेश होतो.

'सरकारनं ऑफलाइन उपक्रमांना चालना द्यावी' : तसंच, त्यांनी अशी मागणी केली की, सरकारनं मोबाईल फोन किंवा स्क्रीन्सच्या गरजेनुसार वापराला प्रोत्साहन द्यावं, 'ऑफलाइन' उपक्रमांना चालना द्यावी आणि तरुणांचं मानसिक आरोग्य व 'डिजिटल व्यसना'चे आरोग्यावर होणारे परिणाम यांविषयी सर्वसमावेशक व्यापक चर्चा करावी. डिजिटल व्यसनाधीनतेचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. सरकारनं याकडे गांभीर्यानं लक्ष देऊन तरुणांच्या मानसिक आरोग्यासोबतच यावर उपाययोजना कराव्यात,' असं आवाहनही ओ'ब्रायन यांनी केलं.





# इंधन साठा मुबलक, साठेबाजी करू नका जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून कुठेही इंधन टंचाई नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता घाबरून न जाता आवश्यक तेवढेच इंधन खरेदी करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.





डॉ.किरण पाटील, जिल्हाधिकारी, बुलढाणा

अलीकडे इंधन टंचाईच्या अफवांमुळे काही ठिकाणी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात साठेबाजी करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सतर्कता वाढवली असून साठेबाजी, काळाबाजार किंवा अन्य गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे सक्त आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवर पुरवठा सुरळीत सुरू असून नागरिकांनी संयम राखून गरजेपुरतेच इंधन घ्यावे, असेही प्रशासनाने नमूद केले आहे.

## पेट्रोल पंपावर २०० लिटरची टाकी भरुन नेली; इंधन टंचाईच्या अफवांमुळे ग्राहकांची झुंबड





**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यात इंधन टंचाईच्या अफवांमुळे पेट्रोल पंपांवर ग्राहकांची मोठी गर्दी होत असल्याचे चित्र दिसत आहे. चिखली येथील एका पेट्रोल पंपावर तर एका ग्राहकाने चक्क २०० लिटर क्षमतेची पाण्याची टाकी घेऊन येत ती डिझेलने भरून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ग्राहकाने पंपावर मोठी प्लास्टिक टाकी आणून कर्मचाऱ्यांकडून ती डिझेलने भरून घेतली. विशेष म्हणजे, जिल्हाधिकाऱ्यांनी इंधन साठेबाजी टाळण्यासाठी कडक आदेश जारी केले असतानाही या आदेशांचे उल्लंघन होत असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. दरम्यान, इंधन टंचाईच्या अफवांमुळे इतर ग्राहकही प्लास्टिक डबे, कॅन आणि विविध भांडी घेऊन पंपावर रांगेत उभे असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याचे प्रशासनासमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. जिल्हाधिकारी यांनी यापूर्वीच इंधन पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट करत साठेबाजी न करण्याचे आवाहन केले आहे. तरीही काही पंप चालकांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याचे समोर येत असून, यावर प्रशासन कोणती कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## रोजगार देणाऱ्या व्यवसायाची गरज...

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर शिक्षणाची द्वारे खुली झाली. वाडी, वस्तीपर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचवण्यासाठी अनेक शिक्षणमहर्षींनी जीवन समर्पित केले. खेडोपाडी शिक्षणाची गंगा पोहोचवली. राज्यात साधारण १ लाख, ४ हजार प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळा आहेत. उच्च शिक्षणाच्या सुविधा देणाऱ्या महाविद्यालयांची संख्यादेखील अधिक आहे. मात्र, राज्यात उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांच्या जागा रिक्त आहेत. तसेच राज्यात प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळांमध्ये दिवसेंदिवस पटसंख्या कमी होत आहे. त्या शाळांना पट नसल्याने अनेक शाळा शेवटच्या घटका मोजत आहेत, तर उच्च शिक्षणातही विद्यार्थ्यांच्या अभावी महाविद्यालये ओस पडत आहेत, अशा परिस्थितीत महाविद्यालयांना परवानग्या दिल्या जात आहेत. राज्यात शाळा, महाविद्यालये ही वेगवेगळ्या व्यवस्थापनाची आहेत. त्यांना विद्यार्थी महाराष्ट्रातूनच मिळणार आहेत. काही प्रमाणात परराज्यांतून आणि परदेशांतून व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतला जात आहे. तरीसुद्धा या महाविद्यालयांची रिक्त संख्या लाखांवर पोहोचली आहे. त्यामुळे लाखांवर रिक्त पदे आणि पुन्हा मान्यता देत वाढत जाणारी महाविद्यालयांची संख्या, त्यावर सरकारचा होणारा खर्च लक्षात घेता, प्राथमिकपासून ते उच्च शिक्षणापर्यंत मान्यता देण्यासंदर्भात 'मास्टर प्लॅन' तयार करण्याची गरज आहे. 'मागेल तिथे शाळा, महाविद्यालय असे न होता, त्यादृष्टीने मान्यतेसाठी आराखडा तयार करण्याची गरज आहे, अन्यथा 'मागेल तेथे शाळा, महाविद्यालय' देण्याच्या प्रयत्नात सरकारचा खर्च वाढत जाण्याचा धोका आहे आणि कोणत्याच महाविद्यालयाला पुरेसे विद्यार्थी मिळेनासे होण्याचा धोका आहे. आज देशातील ९३ हजार शाळा बंद झाल्या आहेत, उद्या याच वेगाने उच्च शिक्षण देणारी महाविद्यालयाची दरवाजे बंद करण्याची वेळ येईल. त्यामुळे आजच तो धोका ओळखायला हवा. आपल्याकडे साधारण आजही ग्रामीण भागातील जे विद्यार्थी उच्च शिक्षणात सहभागी आहेत, ते अधिकाधिक विद्यार्थी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेत प्रवेशित आहेत. ग्रामीण, गरीब विद्यार्थ्यांसाठी पदवीचे शिक्षण म्हणजे पारंपरिक पदवीचे शिक्षण असे मानले जात होते. गरिबांसाठी कला, वाणिज्य शाखेची पदवीपर्यंतचे शिक्षण हे किमान परवडणार आहे, असे मानले जाते. अर्थात, गेली काही वर्षे उच्च शिक्षणाचा खर्च गरिबांच्या आणि अगदीच मध्यमवर्गीयांच्या हाता बाहेर जात आहे. पारंपरिक शिक्षणाचा मार्ग ग्रामीण क्षेत्रातील मुलींसाठी योग्य मानला जात असला, तरी किमान आर्थिक परिस्थिती असेल, तर इतर व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याच्या पाऊलवाटेचा प्रवास घडतो. पारंपरिक शिक्षणाच्या वाटा चालत असताना या पाऊलवाटा विद्यार्थ्यांच्या हाताला काम देऊ शकत नाहीत, हे समोर आले आहे. त्यामुळे पदवीधर असूनही बेरोजगार ठरलेले आहेत. देशातील अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या नुकत्याच जाहीर झालेल्या एका सर्वेक्षणानुसार, ४० टक्के पदवीधरांच्या हाताला काम नाही. याचे कारण आपले उच्च शिक्षणाच्या पदव्या आणि बाजारातील नोकऱ्यांची मागणी यांचे काही नाते उरलेले नाही. त्यादृष्टीने अभ्यास करून सातत्याने अभ्यासक्रमात बदल करण्याची सुविधा, संशोधनाची केंद्रे अस्तित्वात नाहीत. आपल्याला शिक्षणाची जी अनेक ध्येये आणि उद्दिष्टे आहेत, त्यांपैकी रोजगार मिळवून देणे, हे एक आहे. मात्र, त्या उद्दिष्टांपासून आपले उच्च शिक्षण सध्या दूर जात आहे, हे समोर येत आहे. आपल्या राज्यात मोठ्या प्रमाणावर महाविद्यालये असली, तरी तेथील क्षमतेपेक्षा कमी विद्यार्थी दाखल झालेले आहेत. रिक्त पदांची संख्यादेखील अधिकाधिक आहे. अर्थात, केवळ पारंपरिक अभ्यासक्रमाच्या जागा रिक्त आहेत, असे नाही, तर व्यावसायिक अभ्यासक्रमाचे चित्रदेखील कमी-अधिक प्रमाणात तसेच आहे. त्यामुळे आजच त्यावर गंभीरपणे पावले उचलण्याची गरज आहे. दिवसेंदिवस विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे आणि महाविद्यालयांची, अभ्यासक्रमांची संख्या मात्र वेगाने वाढत आहे. आज यासंदर्भात निर्णय झाला नाही, तर उद्या परिस्थिती हाताबाहेर जाण्याचा धोका आहे. महाराष्ट्रापुरता विचार केला, तर कला शाखेच्या पदवी अभ्यासक्रमासाठी ४ लाख, ५७ हजार, ८५३ विद्यार्थी प्रवेशक्षमता आहे. प्रत्यक्षात, २ लाख, ७७ हजार, १६४ विद्यार्थी प्रवेशित झालेले आहेत. पदव्युत्तर पदवीसाठीच्या १० हजार, ११६ जागा असून, त्यांपैकी ३ हजार, ४५१ जागा भरलेल्या आहेत. तीच गत याचा अर्थ कला , विज्ञान, वाणिज्य शाखेचेही. देशातील पारंपरिक अभ्यासक्रमाचे हे वास्तव आहे. राज्यात १०० टक्के विद्यार्थीप्रवेश झालेला एकही अभ्यासक्रम नाही. अगदी 'हाताला काम देणारा अभ्यासक्रम' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पदव्यांचीही कमी-अधिक हीच परिस्थिती. राज्यात पारंपरिक अभ्यासक्रमाच्या एकूण ११ लाख, ३१ हजार, ६६२ प्रवेशक्षमता आहे. त्यांपैकी ६ लाख, ८६ हजार, ७०३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. याचा अर्थ राज्यात ४ लाख, ४४ हजार, ९५९ जागा रिक्त आहेत. पदव्युत्तर पदवीचा विचार करता, राज्यात एकूण प्रवेशक्षमता १ लाख, २० हजार, ५४८ आहे, तर त्यांपैकी ६२ हजार, ९८० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. याचा अर्थ राज्यात ५७ हजार, ५६८ जागा रिक्त आहेत. राज्यात अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचा विचार करता, १ लाख, ७७ हजार, ४१५ एकूण प्रवेशक्षमता आहेत. त्यांपैकी १ लाख, ५१ हजार, ५९३ जागांवर प्रवेश झालेले आहेत. याचा अर्थ येथेही २५ हजार, ८२२ जागा रिक्त आहेत. अभियांत्रिकीच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी १० हजार, ६८६ प्रवेशक्षमता असून, त्यांपैकी ५ हजार, ६२८ जागांवर प्रवेश झालेले आहेत. याचा अर्थ ५ हजार, २८ जागा रिक्त आहेत. राज्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा विचार करता, एकूण १ लाख, ५० हजार, ६६० प्रवेश क्षमता आहे, तर त्यांपैकी १ लाख, ३० हजार, ७४५ जागांवर प्रवेश झालेले आहेत. येथे सुमारे २० हजार जागा रिक्त आहेत. 'बी. डिझाईन'सारख्या अभ्यासक्रमाचा विचार करता, ६६० जागा आहेत आणि त्यांपैकी १४० जागांवर प्रवेश झालेले आहेत, म्हणजे ५२० जागा रिक्त आहे. कमी-अधिक प्रमाणात सर्वच अभ्यासक्रमांची अवस्था अशीच आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत समजल्या जाणाऱ्या आणि आर्थिकदृष्ट्या देशातील इतर अनेक राज्यांपेक्षा अधिक सक्षम असलेल्या राज्याच्या उच्च शिक्षणाची ही अवस्था आहे. महाराष्ट्रात देशातील अधिक रोजगार उपलब्ध करून देण्याची क्षमता आहे. राज्याचा औद्योगिक विकास येथील कारखानदारी, शेती उद्योग, विविध प्रकाराचे व्यवसाय वाढता आहेत. येथे देशभरातून मोठ्या प्रमाणावर रोजगारासाठी लोक येत आहेत. हमखास हाताला काम देणारे राज्य म्हणजे महाराष्ट्र, असे मानले जात होते. आज महाराष्ट्रातही बेरोजगारीचे प्रमाण आहेच. बाहेरून आलेल्या हाताला काम मिळत असल्याने, त्याचा ताण महाराष्ट्रातील सुविधांवर पडतो. त्यामुळे पदवी असूनही रोजगार नाही, म्हटल्यावर रोजगार देणारे व्यवसाय देशभरात सुरू करण्याची गरज आहे. त्याचवेळी देशातील ग्रामीण भागात बेकारी कमी असली, तरी शहरातही नोकरी देण्याची संख्या दिवसेंदिवस कमी होते आहेत. त्यामुळे बेकारीचे प्रमाण ४० टक्क्यांवर पोहोचत असताना, हाताला काम देऊ शकेल, अशा व्यवसायाची गरज आहे. मुळात, इतक्या मोठ्या प्रमाणावर रिक्त जागा का राहात आहेत? त्या रिक्त जागांच्या मागे अतिरिक्त मान्यता हे कारण आहे का? लोकसंख्या नियंत्रणाचा एक मोठा परिणाम शाळा-महाविद्यालयांच्या विद्यार्थी प्रवेशावर होऊ लागला आहे. मुळात, आपल्याकडे दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांची संख्या आणि राज्यातील विविध अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता यांचे काही सूत्र निश्चित करण्याची गरज आहे. यात आज ताळमेळ दिसत नाही.

# लाडक्या बहिणींसाठी आनंदाची बातमी! फेब्रुवारी महिन्याचा हप्ता जमा होण्यास सुरुवात; अदिती तटकरेंनी पोस्ट करत दिली माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारची अत्यंत लोकप्रिय ठरलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या फेब्रुवारी महिन्यातील निधी वितरणाची प्रतीक्षा अखेर संपली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील म हायुती सरकारने फेब्रुवारी महिन्याचा सन्मान निधी महिलांच्या खात्यात जमा करण्याची प्रक्रिया आजपासून अधिकृतपणे सुरू केली आहे. याबाबतची माहिती मंत्री आदिती तटकरेंनी दिली आहे.

पुढील ४८ ते ७२ तासांत रक्कम जमा होणार

राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी यासंदर्भात महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. त्यानुसार, फेब्रुवारी म हिन्याचे १५०० रुपयांचे अर्थसहाय्य लाभार्थी महिलांच्या आधार संलग्न बँक खात्यात वर्ग करण्याची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाली आहे. येत्या २ ते ३ दिवसांत सर्व पात्र महिलांच्या खात्यात ही रक्कम जमा झालेली दिसेल.योजनेच्या माध्यम ातून राज्यातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण व्हावे, या उद्देशाने दरमहा १५०० रुपये दिले जातात. फेब्रुवारी महिन्याचा लाभ कधी मिळणार, याबाबत गेल्या काही दिवसांपासून महिलांमध्ये मोठी उत्सुकता होती. आता प्रत्यक्ष निधी वाटप सुरू झाल्याने कोट्यवधी महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे.प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, ज्या महिलांचे बँक खाते आधारशी जोडलेले आहे आणि ज्यांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण आहे, अशा महिलांना प्राधान्याने हा लाभ मिळत आहे.

मंत्री अदिती तटकरे याविषयी आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाल्या, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना : फेब्रुवारी महिन्याच्या सन्म ान निधी वितरणाची प्रक्रिया सुरू ! मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना फेब्रुवारी महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याची तांत्रिक प्रक्रिया आजपासून सुरू करण्यात आली आहे. पुढील २-३ दिवसांत सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात हा सन्मान निधी जमा होणार आहे. महायुती सरकारचा दृढ निश्चय, आदरणीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब, आदरणीय उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे साहेब, आदरणीय उपमुख्यमंत्री सुनेत्राकाकी पवार यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन व महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींचा दृढ विश्वास या बळावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची दमदार वाटचाल



यापुढेही अशीच सुरू राहणार हा मला विश्वास आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्य सरकारकडून सुरु करण्यात आल्यानंतर त्या योजनेचे काही निकष तयार करण्यात आले होते.

त्या निकषानुसार ज्या कुटुंबाचं वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असेल त्याच लाडक्या बहिणींना या योजनेचा लाभ घेता येणार होता. या योजनेचा लाभ पात्र लाभार्थी महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य सरकारच्यावतीनं लाभार्थींसंदर्भात विविध विभागांकडून प्रथम माहिती मागवली. त्यानंतर राज्यातील सर्व लाभार्थी महिलांना ई केवायसी करण्यास सांगण्यात आलं होतं.

ई केवायसी प्रक्रिया म ोबाईलवरुन किंवा संगणकावरुन पूर्ण करायची होती. ती पूर्ण करताना काही महिलांकडून चुकीचे पर्याय निवडले गेल्याचं समोर आलं होतं. यामुळं ज्या महिलांकडून चुकीचे पर्याय निवडले गेले होते, त्यांना दुरुस्तीची संधी ३१ मार्च पर्यंत देण्यात आली होती. आता लाडकी बहीण योजनेची ई केवायसी दुरुस्त करण्यास महिलांकडे ६ दिवसांचा कालावधी शिल्लक आहे.

# प्रेमाला विरोध करणाऱ्या पोलीस वडिलांची मुलीनं केली हत्या, अनुकंपानं मुलगी बनली पोलीस, प्रियकरामुळं तीन वर्षानं फुटलं बिंग

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** मुलीच्या आनंदासाठी जीव ओवाळून टाकणाऱ्या बापाची त्याच मुलीनं हत्या केल्याची धक्कादायक घटना चंद्रपुरात उघडकीस आली. प्रेमाला बापाचा तीव्र विरोध असल्यानं मुलीनं अतिशय शांत डोक्यानं बापाचा काटा काढला. धक्कादायक बाब म्हणजे, ही घटना तीन वर्षांपूर्वीची असून, आता त्या मुलीचं बिंग फ ुटलं आहे. आर्या बाल्लावार असं आरोपी मुलीचं नाव आहे, तर जयंत बाल्लावार असं त्या बापाचं नाव आहे.

चार आरोपींना अटक केली – या प्रकरणी चंद्रपूरच्या रामनगर पोलिसांनी चार आरोपींना अटक केली. यात मुख्य आरोपी आर्या आणि तिच्या प्रियकराचा समावेश आहे. ही घटना २५ एप्रिल २०२३ रोजी घडली होती. जयंत बाल्लावार हे जिल्हाधिकारी कार्यालयात पोलीस ड्युटीवर असताना प्रशासकीय भवनात भोवळ येऊन खाली पडले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला होता. मात्र, त्यावेळी मृत्यूचं कारण स्पष्ट होऊ शकलं नव्हतं. त्यानंतर अनुकंपाच्या आधारे जयंत



बाल्लावार यांची मुलगी आर्याला पोलीस दलात नौकरी मिळाली. आर्या व तिच्या प्रियकरानं अतिशय शांत डोक्यानं हत्येचा कट रचला होता. सर्वकाही सुरळीत सुरू होतं. मात्र, म्हणतात ना गुन्हा कधीही लपत नाही. एक ना एक दिवस गुन्हा आणि गुन्हेगार पुढे येतात. तसंच काहीसं यात झालं.

आर्या आणि प्रियकरात झाले वाद – वडिलांच्या हत्येनंतर आर्या आणि तिचा प्रियकर आशिष शेडमाके हे विवाह बंधनात अडकले. याच दरम्यान त्या दोघांमध्ये वाद होण्यास सुरुवात झाली. आशिष हा देखील चंद्रपूर पोलीस दलात आहे. लग्नानंतर आर्या सासरी नांदायला तयार नव्हती. ती माहेरीच राहत असल्यानं दोघांमध्ये वाद वाढत गेले. संतापलेल्या आशिषनं थेट रामनगर पोलीस ठाण्यात जाऊन आर्यानं केलेल्या हत्येची माहिती दिली. पोलिसांनी या प्रकरणत आर्या बाल्लावार, आशिष शेडमाके यासह चौघांना अटक केली असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

मिल्क शेकमध्ये दिलं होतं विष – पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जयंत बाल्लावार यांना आर्याचा प्रियकर आशिष हा अजिबात पसंत नव्हता. त्यामुळं त्यांचा प्रेमाला तीव्र विरोध होता. वडील आपल्या प्रेमाला कधी मान्यता देणार नाहीत, असा आर्या आणि आशिष यांचा समज झाला होता. या दोघांनी अतिशय शांतपणे कट रचला. जयंत बाल्लावार ड्युटीवर जाण्यासाठी निघाले असतानाच मुलीनं प्रेमानं त्यांना ज्यूस दिला. त्यांनी देखील शंका उपस्थित न करता ज्यूस पिला आणि ड्युटीवर हजर झाले. काहीच वेळानंतर विष त्यांच्या संपूर्ण शरीरात प्रसरलं आणि त्यांचा मृत्यू झाला.

आर्याच्या मावस भावालाही अटक – आर्यानं तिचा मावस भाऊ चैतन्य गेडामकडून विष विकत घेतलं होतं. तिनं पाच हजार रुपयांना विष विकत घेतल्याचं पोलिसांच्या संपूर्ण तपासात उघड झालं असून, पोलिसांनी त्याला देखील अटक केली आहे.

## भूत बंगलात अक्षय कुमारनं त्याच्यापेक्षा २६ वर्षांनी लहान असलेल्या नायिकेबरोबर केला रोमान्स

हैदराबाद : आगामी चित्रपट भूत बंगलामध्ये सुपरस्टार अक्षय कुमार आणि पंजाबी अभिनेत्री वामिका गब्बी यांची फ्रेश जोडी प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. या चित्रपटामधील नुकतेच तू ही दिसदा हे गाणं रिलीज करण्यात आलं होतं. यामध्ये या दोघांमध्ये चांगली केमिस्ट्री दाखविण्यात आली. आता अक्षय कुमार आणि वामिका गब्बी यांच्या वयाच्या अंतराबद्दल सोशल मीडियावर चर्चा सुरू आहेत. हिंदी चित्रपटांमध्ये वयस्कर पुरुष कलाकारांना त्यांच्यापेक्षा खूपच तरुण असलेल्या अभिनेत्रींना कास्ट करण्याची पद्धत गेल्या अनेक दशकांपासून सुरू आहे, तरी हा मुद्दा आजही चित्रपट रसिकांमध्ये मोठ्या चर्चेचा विषय ठरतो. या मुद्द्यावर भाष्य करताना, अक्षय कुमारनं नुकत्याच एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत आपले विचार मांडले. वयाच्या अंतरावरून होणाऱ्या चर्चांबद्दल बोलताना तो म्हणाला, ''तर मग काय झाले? आपण याआधी असे कधी पाहिले नाहीये का? हॉलिवूडमध्येही असे घडते. काही वेळा, ही पटकथेची () गरज असते. याशिवाय खऱ्या आयुष्यातही, अनेक लोक त्यांच्यापेक्षा वयानं मोठे किंवा लहान असलेल्या जोडीदाराशी लग्न करतात.'' ही चर्चा पुन्हा एकदा जोर धरत असताना, येथे अशा काही चित्रपटांवर एक नजर वळवूया, ज्यामध्ये बॉलिवूडचे आघाडीचे कलाकार त्यांच्यापेक्षा खूपच तरुण असलेल्या अभिनेत्रींबरोबर जोडी म्हणून दिसले आहेत.

# पशुपालकांसाठी माहितीचा खजिना; पशुसंवर्धन विभागाचे 'महापशुधन वार्ता' ई-मासिक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने प्रकाशित होणारे 'महापशुधन वार्ता' हे डिजिटल ई-मासिक पशुपालक, शेतकरी, उद्योजक, पशुवैद्यकीय विद्यार्थी तसेच सामान्य नागरिकांसाठी उपयुक्त माहितीचे प्रभावी माध्यम ठरत आहे. पशुपालन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील शासनाच्या योजना, नवनवीन तंत्रज्ञान, यशस्वी प्रकल्प, प्रशिक्षण उपक्रम, रोगनियंत्रण, तसेच विभागाच्या कार्याची सविस्तर माहिती या मासिकातून नियमितपणे प्रसिद्ध केली जाते.

पशुसंवर्धन सचिव डॉ. रामास्वामी एन. यांच्या संकल्पनेतून या मासिकाची निर्मिती झाली. मे २०२५ रोजी या मासिकाचा पहिला अंक प्रकाशित करण्यात आला होता. आतापर्यंत या मासिकाचे ११ अंक प्रसिद्ध झाले आहेत. या मासिकामध्ये राज्यातील विविध भागातील यशस्वी पशुपालकांच्या प्रेरणादायी यशोगाथा, आधुनिक शेळीपालन, कुक्कुटपालन, गो-आधारित शेती, बायोफ्लॉक मत्स्यपालन, लसीकरण मोहिमा, तसेच पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांचे क्षेत्रीय दौरे व उपक्रम यांच्या माहितीचा समावेश असतो. त्यामुळे हे मासिक केवळ माहितीपर न राहता मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरत आहे. पशुसंवर्धन आयुक्तालयामार्फत हे मासिक प्रकाशित केले जाते. पशुसंवर्धन विभागाच्या संकेतस्थळाबरोबरच आता हे मासिक महाविस्तार ॲपमध्येही वाचता येणार आहे.

मार्च २०२६ च्या अकराव्या अंकात नुकत्याच परळी वैजनाथ येथे झालेल्या अखिल भारतीय स्तरावरच्या महापशुधन एक्स्पो विषयाची माहिती, छायाचित्रे देण्यात आली आहेत. त्याशिवाय आत्मनिर्भर गोशाळा व नैसर्गिक शेतीची गरज, लडाखमधील पशुधनासाठी महाराष्ट्राची मदत, नंदुरबार जिल्ह्यातील दुग्धविकास क्षेत्राला मिळणार चालना आदी विविध विषयांवरील माहितीचाही समावेश आहे.

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी या मासिकाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, ''पशुपालन व दुग्धव्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. विभागामार्फत प्रकाशित होणारे हे मासिक पशुपालकांना आधुनिक तंत्रज्ञान, शासकीय योजना व यशस्वी प्रयोगांची माहिती देणारे प्रभावी साधन आहे. महापशुधन वार्ता हे डिजिटल ई मासिक पशुपालक शेतकरी बांधवांना प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरत आहे. प्रत्येक पशुपालक, तरुण उद्योजक आणि विद्यार्थ्यांनी हे मासिक नियमित वाचावे,'' असे आवाहन त्यांनी केले.

पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. यांनीही या मासिकाच्या वाचनाचे आवाहन करताना सांगितले की, ''राज्यात गुणात्मक पशुधनांची पिढी तयार करण्यासाठी पशुसंवर्धन विभाग प्रभावी धोरण राबवित आहे. त्या अनुषंगाने शेतकरी व पशुपालकांशी



संवाद साधण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून 'महापशुधन वार्ता' हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. पशुपालन क्षेत्रात गुणवत्ता, उत्पादकता व उत्पन्न वाढीसाठी ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. हे मासिक डिजिटल स्वरूपात सर्वांसाठी मोफत उपलब्ध असून, पशुपालकांपर्यंत थेट शास्त्रीय व व्यवहार्य माहिती पोहोचवण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. अधिकाधिक नागरिकांनी या मासिकाचा लाभ घ्यावा.''

पशुपालकांना नियमित मार्गदर्शन करण्यासाठी तसेच विभागाअंतर्गत सुरू असलेले कार्य, मोहिमा, उपक्रम व योजना यासह तांत्रिक माहिती या मासिकाच्या माध्यमातून पशुपालकांपर्यंत पोचविले जाते. हे मासिक पशुसंवर्धन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून, इच्छुक वाचकांनी ते डाउनलोड करून वाचावे, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रदीपकुमार देवरे यांनी केले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# आरोग्य सेविकेचा पुढाकार; एचपीव्ही लसीकरणावर वाढला विश्वास

## जवळखेड प्राथमिक आरोग्य केंद्राचा एचपीव्ही लसीकरणाबाबत सकारात्मक संदेश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** प्राथमिक आरोग्य केंद्र, जवळखेड येथे एचपीव्ही (HPV) लसीकरणाबाबत सकारात्मक व प्रेरणादायी संदेश देणारी घटना घडली असून, आरोग्य सेविका वर्षा नागरे यांनी स्वतःच्या मुलीला HPV लस देऊन समाजात विश्वास निर्माण करण्याचे उल्लेखनीय कार्य केले आहे.

ग्रामीण भागात लसीकरणाबाबत अनेकदा भीती, अफवा व गैरसमज आढळून येतात. या पार्श्वभूमीवर वर्षाताई नागरे यांनी स्वतःच्या कृतीतून आधी केले मग सांगितले या तत्त्वाचा अवलंब करत नागरिकांसमोर विश्र्वासार्ह उदाहरण ठेवले आहे. त्यांच्या या निर्णयामुळे परिसरातील पालकांमध्ये सकारात्मक चर्चा सुरू झाली असून, अनेकांनी आपल्या मुलींच्या लसीकरणाबाबत पुढाकार घेण्याची तयारी दर्शविली आहे.

HPV (ह्यूमन पॅपिलोमा व्हायरस) हा संसर्गजन्य विषाणू असून, त्यातून पुढे गर्भाशयाच्या कर्करोगाचा धोका निर्माण होऊ शकतो. भारतात महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगांमध्ये गर्भाशयाच्या कर्करोगाचे प्रमाण लक्षणीय आहे. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून HPV लसीकरण अत्यंत प्रभावी मानले जाते. तज्ज्ञांच्या मते, ९ ते १४ वयोगटातील मुलींना ही लस दिल्यास भविष्यातील धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो.




आरोग्य विभागामार्फत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एचपीव्ही लसीकरण मोहीम राबविण्यात येत असून, शाळा, अंगणवाडी व गावपातळीवर जनजागृती करण्यात येत आहे. आशा वर्कर, ANM आणि आरोग्य कर्मचारी घरभेटीद्वारे पालकांना समुपदेशन करत आहेत. यावेळी वर्षा नागरे म्हणाल्या, लसीकरणाबाबत भीती बाळगण्याचे कोणतेही कारण नाही. मी माझ्या स्वतःच्या मुलीला लस दिली आहे, कारण तिचे आरोग्य माझ्यासाठी सर्वात महत्त्वाचे आहे. प्रत्येक पालकाने आपल्या मुलीच्या सुरक्षित भविष्यासाठी हा निर्णय घ्यावा. तसेच, संबंधित जनजागृतीपर व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसारित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे, जेणेकरून अधिकाधिक लोकांपर्यंत योग्य माहिती पोहोचेल आणि गैरसमज दूर होतील.

आरोग्य विभागाने स्पष्ट केले की, HPV लस सुरक्षित, प्रमाणित व प्रभावी असून ती शासनाच्या आरोग्य सेवांद्वारे उपलब्ध आहे. पालकांनी पुढाकार घेऊन पात्र मुलींचे वेळेत लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. आज घेतलेला योग्य निर्णय उद्याच्या आरोग्यदायी आयुष्याची हमी ठरतो, असा संदेश देत आरोग्य विभागाने नागरिकांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# हंगामाच्या मध्यावर सनरायझर्सला मिळणार पॅट कमिन्सची साथ ?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आयपीएल २०२६ च्या आधी पॅट कमिन्सबाबत एक महत्त्वपूर्ण बातमी समोर आली आहे. हा ऑस्ट्रेलियन अष्टपैलू क्रिकेटपटू पाठीच्या दुखापतीतून सावरत असून, तो स्पर्धेतील सुरुवातीचे सामने खेळू शकणार नाही. मात्र, सर्व काही सुरळीत पार पडल्यास आपण आयपीएलच्या दुसऱ्या टप्प्यात आणि प्लेऑफमध्ये पुनरागमन करू शकू, अशी आशा त्याने व्यक्त केली आहे.

पॅट कमिन्स पाठीच्या दुखण्याने त्रस्त आहे. ॲशेस मालिकेत केवळ एक कसोटी सामना खेळल्यानंतर, तो २०२६ मध्ये एकही सामना खेळलेला नाही. तो २०२६ च्या टी-२० विश्वचषकासाठी श्रीलंकेलाही गेला नव्हता. आयपीएल सुरू होण्यापूर्वी, कमिन्सने सांगितले होते की तो स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात आणि अंतिम सामन्यात नक्कीच खेळेल. त्याने सांगितले, ''मी अजूनही माझ्या पाठीच्या दुखापतीतून सावरत आहे, पण मला बरे वाटत आहे. मी नेटमध्ये गोलंदाजी करत आहे. आयपीएल लवकरच सुरू होणार आहे. मी सुरुवातीला खेळू शकणार नाही, पण जास्त वेळ लागणार नाही. सध्या मी दर तिसऱ्या दिवशी गोलंदाजी करत आहे. स्पर्धेच्या मध्यापर्यंत पूर्णपणे तंदुरुस्त होण्याची आम्ही योजना आखली आहे. आशा आहे की, काही अडचण न आल्यास, मी स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात आणि अंतिम सामन्यात खेळू शकेन.''

कमिन्सच्या अनुपस्थितीत, सनरायझर्सने ऑरेंज आर्मीची सूत्रे इशान किशनकडे सोपवली आहेत. इशानने २०१६ मध्ये गुजरात लायन्सकडून आयपीएलमध्ये पदार्पण केले होते. आता, तो पहिल्यांदाच आयपीएल संघाचे कर्णधारपद भूषवणार आहे. तो २०१८ ते २०२४ पर्यंत मुंबई इंडियन्स संघाचा भाग होता. इशानने २०२५-२६ च्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये झारखंडचे नेतृत्व करत संघाला विजेतेपद मिळवून दिले होते. यामुळे त्याला २०२६ च्या विश्वचषक संघात स्थान मिळाले. आता, तो आयपीएलमध्येही त्याच यशाची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न करेल. या स्पर्धेत ईशानला अभिषेक शर्माची साथ मिळेल.

अभिषेक २०१९ पासून एसआरएच सोबत आहे आणि त्याने भारताच्या २०२६ च्या टी-२० विश्वचषक विजयात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

सनरायझर्स हैदराबाद आपला पहिला सामना २८ मार्च रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळूरविरुद्ध खेळेल. हा हंगामातील सलामीचा सामना असेल. २ एप्रिल रोजी त्यांचा सामना कोलकाता नाईट रायडर्सशी होईल. त्यांचा पहिला घरचा सामना ५ एप्रिल रोजी लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध होईल. त्यानंतर ११ एप्रिल रोजी पंजाब किंग्सविरुद्ध सामना होईल.

# संजय राऊत जनतेमध्ये घबराट पसरवून इंधन साठेबाजी करण्यास भाग पाडत आहेत

## भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांचा प्रहार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** संजय राऊत हे इंधन, गॅस तुटवड्याबाबत घबराट पसरवत अराजक माजवण्याचा प्रयत्न करत आहेत. घबराटीमुळे लोकांना इंधन साठेबाजी करण्यास राऊत भाग पाडत असल्याचा प्रहार भारतीय जनता पार्टीचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शुक्रवारी केला. राऊत आणि विरोधक जाणीवपूर्वक जनतेमध्ये चुकीच्या बातम्या पेरत असल्यामुळे लोकं नाहक इंधन आणि गॅस मिळवण्यासाठी लांब रांगा लावत आहेत. खरेतर भारताचा तिरंगा पाहून भारतीय जहाजांना हॉर्मुझ सामुद्रधुनीतून इंधन घेऊन जाणा-या जहाजांना जाण्यास परवानगी मिळत आहे. तसेच देशात २ महिने पुरेल इतका इंधन साठा शिल्लक असून घाबरण्याचे कारण नाही. जनतेने सतर्क राहून राऊत आणि विरोधकांचा डाव उधळून लावावा असेही त्यांनी नमूद केले.

श्री. बन म्हणाले की, इराण-इस्रायल युद्धामुळे जगभरात इंधन, गॅस पुरवठा विस्कळीत झाला असताना केंद्र सरकार आणि महायुती सरकार युद्धस्तरावर जनतेला दिलासा देण्याचे काम करत आहेत. एलपीजी गॅस सिलेंडर धारकांना दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने शिधापत्रिका धारकांना प्रत्येकी ३ लिटर रॉकेल उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे.

राऊतांना लक्ष्य करत श्री. बन म्हणाले की, काँग्रेसचे तीर्थ पिऊन पावन झालेल्या संजय राऊतांना हिंदुत्वाची किंमत कळणारच नाही. एनडीए सरकार आणि महायुती सरकारला विरोधाला विरोध करायचा या धोरणानुसार संजय राऊत इराण-इस्त्रायल युद्धामुळे जगभरात इंधन, गॅस पुरवठा विस्कळीत झाला असताना महायुती सरकारतर्फे रेशनकार्ड धारकांना पुरवण्यात येणा-या रॉकेलचा संबंध हिंदुत्वाशी जोडत आहेत. यातून राऊत हे त्यांची वैचारिक दिवाळखोरी सिद्ध करत आहेत अशी टीकाही श्री. बन यांनी केली. जनतेला दिलासा देण्यासाठी आखलेल्या उपाययोजनांमध्येही संजय राऊत घाणेरडे राजकारण करत आहेत. हिंदुत्वावरून भाजपा आणि केंद्र सरकारवर टीका करण्याचा राऊतांना अधिकार नाही असेही त्यांनी खडसावले.




श्री. बन म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वामुळे या संकटात भारतीयांना झळ पोहोचत नाही आहे. केंद्र सरकारने पेट्रोलवरील उत्पादन शुल्क कमी करण्याचा तर डिझेलवर तर शून्य टक्के उत्पादन शुल्क केल्याने जनतेला दिलासा मिळत आहे. श्रीलंका, बांगलादेश, पाकमध्ये पेट्रोल डिझेलच्या किंमती साडे तीनशे रुपये प्रति लिटर झाल्या असून भारतात मात्र या किमती आवाक्यात ठेवण्यात पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या मंत्रालयांना यश आले असल्याचेही ते म्हणाले.

उबाठा गटामध्ये ठाकरे गट विरुद्ध राऊत गट असे द्वंद्व रंगले असून आता आदित्य ठाकरेंबद्दल खोट्या बातम्या पेरण्यापर्यंत राऊतांची मजल गेली असल्याची टीका श्री. बन यांनी केली. याआधीही राज्यसभेच्या जागेवरून राऊतांनी ठाकरे गटाच्या प्रियंका चतुर्वेदींना बाजूला सारून शरद पवारांचे नाव पुढे केले होते, याची आठवण करून देत श्री. बन म्हणाले की, आदित्य ठाकरे यांची बदनामी करत राऊत खासदारकी पदरात पाडून घेण्यासाठी काँग्रेसच्या वळचणीला जाऊन बसणार आहेत.

# मुंबई विभागीय क्रीडा निपुणता केंद्रासाठी निवड चाचण्या जाहीर



दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी :** गॅस-पेट्रोल टंचाईची अफवा खोटी; साठेबाजी टाळा पालकमंत्र्यांचे आवाहन सातारा : जिल्ह्यात गॅस, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून कोणतीही टंचाई नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अनावश्यक साठेबाजी टाळावी, असे आवाहन पालकमंत्री यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत अत्यावश्यक सेवांचा पुरवठा सुरळीत ठेवण्याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्ह्यात इंधन आणि गॅसचा पुरवठा नियमित सुरू असल्याची माहिती देण्यात आली. नागरिकांनी घाबरून पेट्रोल पंप किंवा गॅस एजन्सींवर गर्दी करू नये, असेही प्रशासनाने सांगितले. तसेच, वाहनांमध्ये आवश्यकतेपेक्षा अधिक इंधन साठवणे किंवा घरात कॅनमध्ये इंधन ठेवणे धोकादायक असल्याचा इशाराही देण्यात आला. अशा प्रकारांवर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले.

जिल्ह्यात सध्या ३३७ पेट्रोल पंप आणि ८९ गॅस एजन्सी कार्यरत असून सुमारे ९ लाख ६४ हजारांहून अधिक ग्राहकांना नियमित पुरवठा केला जात आहे. साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी तहसीलदार स्तरावर भरारी पथकेही नियुक्त करण्यात आली आहेत. नागरिकांनी शांतता राखून प्रशासनाला सहकार्य करावे आणि कोणत्याही अफवांना बळी पडू नये, असे आवाहन पालकमंत्र्यांनी केले आहे.

# पंढरपूर-शेगाव (भूम परंडा मार्गे) नवीन रेल्वेमार्ग मंजूर करा, खा. ओमराजे निंबाळकर यांची लोकसभेत आक्रमक मागणी

नवी दिल्ली: धाराशिव लोकसभेचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी लोकसभेत अत्यंत महत्त्वाचा आणि जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न प्रभावीपणे उपस्थित करत पंढरपूर-शेगाव नवीन रेल्वेमार्ग मंजूर करण्याची जोरदार मागणी केली. सोलापूर, धाराशिव आणि बुलढाणा या तीन जिल्ह्यांच्या दृष्टीने हा रेल्वेमार्ग अत्यंत महत्त्वाचा असून, तो महाराष्ट्रातील लाखो भाविकांच्या श्रद्धेशी निगडित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

लोकसभेत बोलताना खासदार निंबाळकर यांनी नमूद केले की, पंढरपूर विठ्ठल-रुक्मिणी मंदिर आणि शेगाव गजानन महाराज मंदिर ही महाराष्ट्रातील दोन प्रमुख तीर्थक्षेत्रे असून, येथे दरवर्षी कोट्यवधी भाविक दर्शनासाठी येतात. मात्र, या दोन्ही तीर्थक्षेत्रांना थेट रेल्वेने जोडणारा मार्ग नसल्याने भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. प्रस्तावित रेल्वेमार्ग पूर्ण झाल्यास प्रवास अधिक सुलभ, जलद आणि सुरक्षित होईल, मराठवाडा विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र रेल्वे मार्गाने थेट जोडला जाईल. ज्याचा फायदा सामान्य नागरिक आणि भाविकांना होणार आहे. खासदार निंबाळकर यांनी या रेल्वेमार्गाचे महत्त्व केवळ धार्मिक पर्यटनापुरते मर्यादित नसून, तो सोलापूर, धाराशिव आणि बुलढाणा या जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठीही अत्यंत उपयुक्त ठरेल, असे ठामपणे मांडले. या मार्गामुळे व्यापार, उद्योग, शेतीमाल वाहतूक आणि रोजगाराच्या संधींना चालना मिळणार असून, या मागास भागाच्या विकासाला नवी गती मिळेल, असे त्यांनी सांगितले.


# शब्दकोडे क्र. 93

आडवे शब्द

१. '.... याचवेळी तू असशील तेथे बाळा पाजविले'-'गदिमां'ची कविता ९. नवऱ्याचा भाऊ १०. धातूवर कोरलेली देवप्रतिमा ११. श्वान १२. उत्तर-पश्चिममधील उपदिशा १४. रवाळ १६. मांडणी करणारा १९. भूपती, राणीचा पती २०. आश्रय २१. खून २२. बाज विणण्याची रुंद पट्टी २४. आणि २५. माकडातील एक प्रकार २७. एकूणएक, सर्व ३०. विश्वासघातकी ३२. समुद्रातील अग्नी ३३. किरकोळ सामान ३६. थोरवी ३८. रेशमी धोतर ४०. उंटाच्या पाठीवरील उंचवटा ४१. पराभव, माळ ४२. अथवा, किंवा ४३. षष्ठीचा देवता ४५. कच्चे लिखाण (इंग्रेजी) ४६. चषक, पेला ४९. आजच्या आधीचा दिवस ५०. मिठाची चव ५२. लोचट वागणेबोलणे ५४. रत्नाने मढविलेला दागिना ५५. विविध ५६. पातळ खांब ५८. अन्न घशाशी येऊन पोटात ढवळणे ५९. वर्ष, साल ६१. विद्येचे माहेरघर ६२. भुतांचा राजा ६४. खोटाच्या विरूद्ध ६५. वेदना ६६. 'आम्ही जातो आमुच्या गावा, आमुचा ---- घ्यावा' ६८. मर्यादा, हद्द ६९. शोध, मार्ग ७१. वारा ७३. जन्म-मृत्यू ७४. पु.ल. देशपांडे यांचे एक विनोदी नाटक

उभे शब्द

१. कैफ, नशा २. दार ३. बारावी रास ४. रम्य, मनोहर ५. नुकसान ६. मगर ७. चैतन्य, जीव ८. मुलेबाळे असलेला १३. दुःख १५. गूढपणे, गूढरीत्या १७. देशाचे नाणे १८. कर्ण १९. भारताचे दोन महान ग्रंथ २३. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री २५. उत्तराधिकारी २६. स्थितिस्थापकत्वाचा गुण असलेला पदार्थ २८. पारंब्या असलेला वृक्ष २९. तरतरीत, ताजा --- ३०. नीच, दुष्ट ३१. अनाथ ३४. फळावरील साल ३५. सडेतोड बोलणारा ३७. शंकर ३९. रुग्णालय ४३. मनाला टोचणारे दुःख ४४. ईर्ष्या, बळ ४७. नावापुरता अननसाचा भाऊबंद ४८. नटविणे ४९. संध्याकाळ ५१. टिंगल करणारा ५३. कमी होणे (भाव, तब्येत वगैरे) ५५. ख्रिसमस (मराठीत) ५७. दंड आणि भेद करण्याआधी करण्याचे दोन उपाय ५८. जखमेवर लावण्याचे स्निगध औषध ६०. साहित्यातील नऊ भावना ६१. प्राचीन, जुने ६३. वाट फुटेल तसे वेगाने पळणे ६५. हिंदीत शपथ ६६. रात्रीचा पाऊस ६७. श्रीरामाचे एक नाव ७०. विडा ७१. चाळीस शेर ७२. चुलती (हिंदी)



## शब्दकोडे क्र. 92 चे उत्तर

आडवे उत्तर

१.नफानुकसान ५.धमक ७.कष्ट ८.वासे ९.मदतनीस ११.सवड १३.माग १४.दरड १५.परतवेल १७.तानसेन १८.कसदार २०.कधी २१.विसार २२.वायदा २४.पुरस्कार २६.रकाना २८.मरगळ ३०.सदरा ३२.रजत ३४.रमजान ३६.मत ३७.बकरी ३९.देर ४०.कडक ४२.गोदान ४३.नंदलाल ४४.रावण ४५.पाटी ४६.वांती ४७.कसब ४९.मासिक ५१.नवलाई ५२.पोर ५३.टपली ५५.तगमग ५७.क्षपणक ६०.गरम ६२.सरडा ६३.पगारदार ६५.नोकर ६६.नवलकथा ६८.दारोदार ७०.रणरण ७१.हलधर ७२.सकल ७३.भोक

उभे उत्तर

१.नवा २.फासेपारधी ३.साष्टांग नमस्कार विनंती विशेष ४.उदर ५.धनी ६.मस ७.कडवे ९.मदन १०.तडकसार ११.सर १२.वतनदार १३.माता १५.परवा १६.लडिवाळ १९.सरकार २०.कळस २३.यमन २४.पुरातन २५.रज २७.नामदेव २९.गरुड ३१.धमकी ३३.तबला ३५.जारणमारण ३८.कलकलाट ४०.कटकट ४१.कर्म ४२.गोपाळ ४४.राब ४८.सई ५०.मतदार ५१.नगर ५२.पोपडा ५४.पडी ५६.मगर ५७.क्षर ५८.कणव ५९.उपकार ६१.मनोबल ६२.सरदार ६२अ. कथानक ६४.दाभण ६६.नरक ६७.लक्ष्य ६९.दास

# एल.टी.टी. बल्लारशहा रेल्वेला शेगांव येथे थांबा मंजूर

## खामगांव–जालना रेल्वे मार्गासंदर्भात केंद्रिय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांची केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतली भेट

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी :** संतनगरी शेगांव रेल्वे मार्गाने नियमीत धावणाऱ्या परंतु थांबा नसणाऱ्या एल.टी.टी. बल्लारशहा एक्स्प्रेसला शेगांव रेल्वे स्थानकावर थांबा मंजुरी केल्याप्रकरणी केंद्रिय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांची आज केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन आभार व्यक्त केले. तर खामगांव–जालना रेल्वे मार्गा संदर्भात गोड बातमी लवकरच देऊ असे सुचक वक्तव्य केंद्रिय रेल्वे मंत्र्यांनी चर्चेदरम्यान केले. त्यामुळे खामगांव–जालना रेल्वे मार्गाबद्दल केंद्र सरकारची सकारात्मकता दिसुन आली. या रेल्वे मार्गासंदर्भात अंतिम मंजुरातीची घोषणा होण्याची शक्यता आहे.


विदर्भाची पंढरी म्हणुन ओळख असलेल्या बुलढाणा जिल्हयातील संत नगरी शेगांव येथे दररोज देशभरातुन लाखो भाविक येत असतात. शेगांव रेल्वे मार्गावरील नियमीत धावणाऱ्या एल.टी.टी. बल्लारशहा एक्स्प्रेस सह इतर ३ सुपर फास्ट एक्स्प्रेसला शेगांव रेल्वे स्थानकावर थांबा मिळावा, अशी मागणी केंद्रिय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी गेल्या महिन्यामध्ये केंद्रिय रेल्वे मंत्र्यांची भेट घेऊन केली होती. त्यातील एल.टी.टी. बल्लारशहा एक्स्प्रेसला रेल्वे मंत्रालयाच्या वतीने थांबा मंजुर करण्यात आला आहे.

२७ मार्च ला केंद्रिय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांची दिल्ली येथे भेट घेऊन बल्लारशहा एक्स्प्रेसला थांबा दिल्याबद्दल केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी आभार व्यक्त केले. याचवेळी खामगांव–जालना रेल्वे मार्गासंदर्भात रेल्वे मंत्र्यांसोबत चर्चा करत असतांनाच त्यांनी रेल्वे मंत्रालय या रेल्वे मार्गासंदर्भात वेगाने काम करत असुन लवकरच तुम्हाला आनंदाची बातमी देऊ असे सुचक विधान त्यांनी केले.

खामगांव–जालना रेल्वे मार्गासंदर्भात रेल्वे मंत्र्यांनी अत्यंत सकारात्मक भुमिका दर्शविल्याने खामगांव–जालना रेल्वे मार्गासंदर्भात केंद्र सरकारच्या वतीने लवकरच घोषणा होण्याची शक्यता आहे. केंद्रिय रेल्वे मंत्र्यांनी खामगांव–जालना रेल्वे मार्गाबद्दल विस्तृत चर्चाही यावेळी मंत्री महोदयांसोबत केली. इंग्रज काळापासुन हा रेल्वे महामार्ग प्रलंबित असुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खामगांव येथे झालेल्या जाहीर सभेत हा रेल्वे मार्ग करण्याचे आश्वासन बुलढाणा जिल्हयातील जनतेला दिले असल्याचे सांगुन या रेल्वे मार्गामुळे मध्य रेल्वे व दक्षिण रेल्वे जोडल्या जाणार आहे. हा रेल्वे मार्ग व्हावा हि जिल्हयातील नागरीकांची जनभावना आहे. असेही त्यांनी रेल्वे मंत्र्यांसोबत चर्चेत सांगीतले. केंद्रिय रेल्वे मंत्र्यांनी दर्शविलेल्या सकारात्मक भुमिकेमुळे या रेल्वे मार्गाला अंतिम मंजुरात मिळण्याची शक्यता आहे.

## वृत्तविशेष...

### स्विफ्ट कारच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच ठार, मेहकर–जानेफळ मार्गावर भीषण अपघात





दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर–जानेफळ मार्गावर आज दुपारी झालेल्या भीषण अपघातात एका दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू घटना घडली या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे शुक्रवार, २७ मार्च रोजी दुपारच्या सुमारास मेहकर–जानेफळ मार्गावरील घरकुल परिसरात हा अपघात घडला. जानेफळहून मेहकरकडे येणारी स्विफ्ट कार (क्रमांक MH19 AX 7233) वेगात असताना समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दुचाकीस्वाराचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून पुढील तपास सुरू केला आहे. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही. दरम्यान, या मार्गावर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### ज्ञानगंगा अभयारण्य मार्ग रात्री बंद; पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील महत्त्वाचे पर्यटन व जैववैविध्य स्थळ असलेल्या ज्ञानगंगा अभयारण्यातून जाणारा खामगांवबोथाबुलढाणा राज्य मार्ग क्र. २४ हा दररोज रात्री १० ते सकाळी ५ वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती वन विभागाने दिली आहे. वन्यजीव संवर्धन व वन संरक्षणाच्या दृष्टीने जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, बुलढाणा यांच्या आदेशानुसार हा निर्णय लागू करण्यात आला आहे. या मार्गावर खामगांव, बोथा, गोंधनखेड आणि वरवंड येथे एकूण चार वनउपज तपासणी नाके कार्यरत असून संबंधित वेळेत वनकर्मचारी वाहनांची तपासणी करून नोंदी घेतात. तथापि, काही वाहनचालकांकडून रात्रीच्या वेळी नियमांचे उल्लंघन करून तपासणी नाक्यांवरील कर्मचाऱ्यांशी वाद घालण्याचे प्रकार समोर येत आहेत. अशा कृतींमुळे वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत दंड व शिक्षेची तरतूद असून संबंधितांवर फौजदारी कारवाई होऊ शकते, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.वन विभागाच्या माहितीनुसार, रात्रीच्या वेळेस या परिसरात वाघ, बिबट्या आणि अस्वल यांसारख्या वन्यप्राण्यांचा मुक्त संचार असतो. त्यामुळे वाहनांमुळे अपघात होण्याची तसेच वन्यजीवांच्या अधिवासाला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणूनच नागरिकांनी रात्री १० ते सकाळी ५ या वेळेत या मार्गावर प्रवास टाळावा आणि खामगांवउंद्रीवरवंडबुलढाणा या पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### शेगाव येथे सामाजिक न्याय योजनांचे मल्टिमिडिया छायाचित्र प्रदर्शनीचे आज उद्घाटन

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा माहिती कार्यालय व सहाय्यक आयुक्त समाजकल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने, दि. २८ ते ३० मार्च २०२६ या कालावधीत सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जातींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी शेगाव येथील शेगाव नगर परिषदचे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी नगर भवनात मल्टिमिडिया छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.तीन दिवसीय या मल्टिमिडिया छायाचित्र प्रदर्शनामध्ये सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती छायाचित्रे, माहिती फलक व दृकश्राव्य माध्यमांच्या साहाय्याने सादर करण्यात येणार आहे. अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांसाठी शिक्षण, स्वयंरोजगार, निवास व आर्थिक सहाय्य योजनांविषयी मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नागरिक, अधिकारी व कर्मचारी, शालेय विद्यार्थ्यांनी या मल्टिमिडिया छायाचित्र प्रदर्शनीला सकाळी १० ते ५ यावेळेत प्रदर्शनीला भेट देवून योजनांची माहिती जाणून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने केले आहे.

## ‘वाचनाची गोडी वाढवा, पुस्तकाला मित्र बनवा’

### मुंबई शहर जिल्हा ग्रंथोत्सव उद्घाटन समारंभात मान्यवरांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ज्ञान, संस्कार आणि प्रेरणा देणारे प्रत्येक पुस्तक आपल्याला काहीतरी नवीन शिकवते. पुस्तकांशी मैत्री केल्यास कधीच एकटे वाटत नाही. वाचनाची सवय आपल्याला आयुष्यभर साथ देणारी आणि यशाच्या मार्गावर पुढे नेणारी असल्याने विद्यार्थ्यांसह सर्वांनीच वाचनात गोडी वाढवून पुस्तकाला मित्र बनवावे, असे आवाहन मुंबई शहर जिल्हा ग्रंथोत्सवच्या उद्घाटन समारंभात मान्यवरांनी केले. उच्च व तंत्र शिक्षण विभाग ग्रंथालय संचालनालय जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय मुंबई शहर आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय दादर (पूर्व) मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय येथे दोन दिवशी मुंबई शहर ग्रंथोत्सव–२०२५ आयोजन करण्यात आले आहे.

या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन लेखक, चित्रकार व ज्येष्ठ पत्रकार प्रकाश बाळ जोशी यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी शशिकांत काकड, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे प्रमुख कार्यवाह रवींद्र गावडे, बृहन्मुंबई जिल्हा ग्रंथालय संघाच्या अध्यक्ष सुचिता मोरे, बृहन्मुंबई दक्षिण विभाग कार्यालयाच्या शिक्षण निरीक्षक डॉ. वैशाली वीर, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या कार्याध्यक्ष शीतल करदेकर, उमा नाबर यांच्यासह साहित्यप्रेमी आणि विद्यार्थी उपस्थित होते. वाचन ही केवळ माहिती मिळवण्याची प्रक्रिया नसून ती मनाला समृद्ध करणारी आणि विचारांना नवी दिशा देणारे एक ऊर्जा स्त्रोत असल्याने लहानपणापासूनच विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड जोपासावी, असे सांगत लेखक प्रकाश बाळ जोशी म्हणाले, ग्रंथालयाने वाचनाचा वारसा जतन केला आहे. ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्यास मदत होईल. सकाळी ग्रंथदिंडीमध्ये असलेला मुलांचा सहभाग, त्यांचा उत्साह मनाला भारावून टाकणारा होता, असे गौरवोद्गारही त्यांनी यावेळी काढले.प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर म्हणाले, राज्यात ११ हजारावर शासन मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालये आहेत. या ग्रंथालयांच्या माध्यमातून वाचन संस्कृती अधिक वृद्धींगत होत आहे. राज्य शासनामार्फत दरवर्षी जिल्हास्तरावर ग्रंथोत्सव आयोजित करून वाचन संस्कृतीला अधिक बळ दिले जात आहे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर येथे आयोजित ग्रंथोत्सवातील ग्रंथदालनांचा लाभ नागरिक व वाचकांनी घ्यावा.

विद्यार्थ्यांनी स्क्रीन टाइमिंगपासून थोडे बाजूला होऊन पुस्तकांना मित्र बनवावे असे शिक्षण निरीक्षक डॉ. वैशाली वीर यांनी यावेळी म्हणाल्या. तर मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे प्रमुख कार्यवाह रवींद्र गावडे यांनी राज्य शासनाने मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयास पुस्तकांचे डिजिटलायझेशन करण्यासाठी पाच कोटीचा निधी मंजूर केला असल्याचे सांगितले.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी शशिकांत काकड यांनी ग्रंथोत्सवातील दोन दिवसात होणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती प्रास्तविकात दिली. ग्रंथोत्सव हा वाचन संस्कृतीचा उत्सव असून दोन दिवस चालणाऱ्या या ग्रंथोत्सव व पुस्तक प्रदर्शनास भेट देऊन एक तरी पुस्तक खरेदी करून वाचक, साहित्यप्रेमी आणि विद्यार्थ्यांनी ग्रंथोत्सवाचा मनमुराद आस्वाद घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले

तत्पूर्वी ग्रंथदिंडी काढण्यात आली. या ग्रंथ दिंडीमध्ये ज्ञानेश्वर विद्यालय, दिगंबर पाटकर विद्यालय, राजा शिवाजी विद्यालय, सोशल सर्विस लीग विद्यालय, आर. एम. भट हायस्कूल, शिशुविहार माध्यमिक विद्यालय, गुरु नानक विद्यालय, बंगाली एज्युकेशन स्कूल, बालमोहन विद्यामंदिर आणि कीर्ती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ग्रंथदिंडीत सहभागी झालेल्या शाळांचा मान्यवरांच्या हस्ते पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.

## डफड्याच्या तालावर देवीच्या सोंगासमोर रविकांत तुपकरांनी धरला ठेका






**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा तालुक्यातील खुपगाव येथे शेकडो वर्षांपासून देवीच्या यात्रेची परंपरा आहे. देवीचे सोंग हे या यात्रेचे प्रमुख आकर्षण असते. शेतकरी नेते रविकांत तुपकर दरवर्षी या यात्रेला भेट देऊन मनोभावे पूजा करतात. या वर्षी देखील रविकांत तुपकर गावात यात्रेत पोहोचले.

यावेळी भाविकांच्या आग्रहास्तव तुपकरांनी डफड्याच्या तालावर ठेका धरला. पारंपरिक वाद्याच्या चालीवर पारंपारिक ताल धरून तुपकरांनी सर्वांचे मने जिंकली. देवीच्या सोंगासमोर देवीला पावली दाखवत तुपकर यांनी पारंपरिक नृत्य सादर करून ग्रामीण संस्कृती आणि परंपरेशी त्यांची नाळ कायम असल्याचे दाखवून दिले. तसेच स्वतः डफडे वाजवून वाजवणारे व इतर ग्रामस्थांचा उत्साह वाढविण्याचे काम देखील केले. रविकांत तुपकरांचे हे आगळे वेगळे रूप पाहून ग्रामस्थ आणि भाविक अवाक झाले होते.

## राज्यस्तरीय शालेय तेंग सु–डो क्रीडा स्पर्धेचा समारोप थाटात संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच तेंग सु–डो स्पोर्टस असोसिएशन, नांदुरा यांच्या सहकार्याने आयोजित राज्यस्तरीय शालेय तेंग सु–डो क्रीडा स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

दि. २४ ते २५ मार्च दरम्यान छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृह, नगर परिषद, नांदुरा येथे १४, १७ व १९ वर्षांखालील मुला–मुलींसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. राज्यभरातील विविध विभागांतून ४८ मुलगे व ४८ मुलींचे संघ, व्यवस्थापक, पंचाधिकारी व स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी तेंग सु–डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र राज्यचे अध्यक्ष रॉकी डिसोजा, प्रमुख अतिथी म्हणून सुभाष मोहीते, अनिल अंबुसकर, विजय अंबुसकर, पुरुषोत्तम निळे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस महानकर यांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व खेळाडू, प्रशिक्षक व पंचांचे कौतुक केले. पराभूत खेळाडूंनी सातत्याने सराव करून पुढील स्पर्धांमध्ये यश मिळवावे, असे आवाहन करत विजेत्यांचे अभिनंदन केले. अध्यक्षीय भाषणात रॉकी डिसोजा यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले.

स्पर्धेत सर्व सहभागी खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले, तर प्राविण्य प्राप्त खेळाडूंना प्रमाणपत्रे व पदके मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. ऑल ओव्हर गुणांकनात मुंबई विभाग प्रथम, अमरावती विभाग द्वितीय, पुणे विभाग तृतीय व लातूर विभाग चतुर्थ क्रमांकावर राहिले. विजेत्या संघांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल अंबुसकर यांनी तर विजय अंबुसकर यांनी आभार प्रदर्शन केले. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा अधिकारी, मार्गदर्शक, पंच, स्वयंसेवक व तेंग सु–डो असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### आनंदवार्ता! होर्मुज सामुद्रधुनीत अडकलेले भारतीय जहाज ‘जग वसंत’ गुजरातमध्ये दाखल

नवी दिल्ली : इराण युद्ध आणि होर्मुज सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे अनेक दिवस अडकून पडलेले भारतीय ध्वजधारी 'जग वसंत' हे जहाज अखेर भारतात पोहोचले आहे. भारतीय ध्वज असलेले हे जहाज आज म्हणजेच शुक्रवार, २७ मार्च रोजी सकाळी गुजरातमधील बंदरावर दाखल झाले.

गेल्या काही दिवसांत भारतीय ध्वजधारी 'पाइन गॅस' आणि 'जग वसंत' या दोन जहाजांनी होर्मुज सामुद्रधुनी पार केली होती. शिप ट्रॅकिंग डेटानुसार, मागील सोमवारी ही दोन्ही जहाजे इराणमधील लारक आणि केश्म बेटांदरम्यान दिसून आली होती. पश्चिम आशियातील युद्धामुळे होर्मुज सामुद्रधुनीत अडकलेल्या २२ भारतीय जहाजांपैकी ही दोन्ही जहाजे होती.

## शतकांची परंपरा जपणारे किनगाव जट्टू; रामनवमी उत्सवात भाविकांचा उत्साह उसळला!

दैनिक आपला विदर्भ

■ केशव सातपुते





**किनगाव जट्टू :** तालुक्यातील किनगाव जट्टू येथे दि. २६ मार्च रोजी श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिभावात साजरा करण्यात आला. सुमारे इ.स. १७१७ मध्ये रघुजी भोसले यांनी श्रीराम मूर्तीची स्थापना करून मंदिराची उभारणी केली. तेव्हापासून गावात रामनवमी उत्सवाची अखंड परंपरा सुरू असून यंदाही ती उत्साहात पार पडली. गुढीपाडव्यापासून रामनवमीपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात श्रीमद् अध्यात्म रामायण कथा सप्ताह, दररोजची पूजा, रुद्राभिषेक, भजन–कीर्तन यांचा समावेश होता. तीनशे वर्षांची ही परंपरा पंचक्रोशीतील भाविक मोठ्या श्रद्धेने जपत आहेत. रामनवमीच्या दिवशी दुपारी बारा वाजता श्रीराम प्रभूंच्या जयघोषात मंदिरात गुलाल उधळून व फटाक्यांच्या आतषबाजीत जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी भजनी मंडळांच्या टाळ–मृदुंगाच्या गजरात श्रीरामाचा पाळणा गाऊन वातावरण भक्तिमय झाले. उपस्थित हजारो भाविकांनी टाळ्यांच्या गजरात या सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यानंतर गावातून ‘‘गोविंदा’’च्या गजरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. रात्री विविध देवी–देवतांच्या सोंगांनी कार्यक्रम अधिक आकर्षक ठरला. दुसऱ्या दिवशी मंदिराचे पुजारी बिन्नीवाले परिवारातर्फे प्रसाद वाटप करून ‘सीता स्वयंवर’ कार्यक्रमाने उत्सवाची सांगता करण्यात आली. गावातील सर्व समाजबांधवांच्या सहकार्याने हा उत्सव यशस्वीरीत्या पार पडला.